


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६७३. वा | शनिवार | दि. ०३ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# राज ठाकरे सुपारी घेऊन बोलतायत,त्या वक्तव्यावर मनोज जरांगेंचा संताप...

**वृत्तसंस्था/मुंबई**

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी गेल्या काही महिन्यांत राज्यभर अनेक आंदोलनं आणि उपोषणं केली. आरक्षणासाठी त्यांनी मुंबईपर्यंत मोर्चाही काढला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आंदोलकांच्या मागण्या मान्य करणारा अध्यादेश काढल्यानंतर विजयोत्सव साजरा करत मराठा आंदोलक स्वगृही परतले. परंतु, त्यानंतरही मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण करणार असल्याची घोषणा केली आहे. मनोज जरांगे पाटील १० फेब्रुवारीपासून बेमुदत उपोषणाला बसणार आहेत. यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. राज ठाकरे म्हणाले, मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर मराठा मोर्चेकरी विजयोत्सव साजरा करत माघारी फिरले. परंतु, त्यांना नेमका कसला विजय मिळाला, हे लोकांना कळले पाहीजे. मोर्चेकरी मराठा बांधवांना नेमका कसला निर्णय झाला हे कळलं का? तसेच तुम्ही विजयी झालात तर मग तुमच्यावर परत उपोषण करण्याची वेळ का आली? दरम्यान, राज ठाकरे म्हणाले, या आंदोलनाला आतून-बाहेरून कोणाचा पाठिंबा आहे ते सर्वांना माहिती आहे. केवळ ती गोष्ट उघड बोलता येत नाही. राज ठाकरे यांच्या या टीकेला मनोज जरांगे पाटील यांनी उत्तर दिलं आहे. मनोज जरांगे म्हणाले, हे सगळे राजकीय डाव आहेत. काही जण राजकीय सुपाऱ्या घेतल्यासारखे बोलतात. मुळात आरक्षण ठेवलेलं असतं का? कोणीतरी गेलं आणि लगेच मिळालं असं काही असतं का? हवं तर राज ठाकरे यांनी माझ्या जागी यावं, मराठ्यांचं नेतृत्व करावं. एका दिवसात आम्हाला आरक्षण मिळवून द्यावं. आम्ही तुमच्या मागे उभे राहतो. मनोज जरांगे पाटील म्हणाले, मुळात आरक्षणाची एक मोठी प्रक्रिया असते. तुम्हाला यात काही मिळालं नाही म्हणून तुमची पोटदुखी सुरू झाली आहे. राज ठाकरे म्हणतायत आरक्षण मिळालं नाही. त्यांचं खरं आहे त्यांना पैसे मिळाले नाहीत. त्यांना पैसे पाहिजे होते, पद पाहिजे होतं, ते मिळालं नाही. मी दुकानंच बंद केली आहेत काही लोकांची. मराठा नेते म्हणाले, राज ठाकरे सतत कोणाची तरी



सुपारी घेऊन बोलतात. यावेळी ते सत्ताधाऱ्यांची किंवा इतर कोणाचीतरी सुपारी घेऊन बोलत आहेत. परंतु, त्यांच्या बोलण्याने काही होणार नाही. आता सर्व मराठे एकवटले आहेत. आरक्षण घेतल्याशिवाय मराठे मागे हटणार नाहीत. मनोज जरांगे पाटील म्हणाले, राज ठाकरे यांनी म्हटल्याप्रमाणे नेमका कसला विजय मिळाला, त्याचा मराठा समाज अभ्यास करतोय. परंतु, मुळात मला एक गोष्ट कळत नाही. राज ठाकरे कधीपासून असे मराठ्यांविरोधात बोलू लागले? ते जाऊन आले का नाशिकला? कारण ते कधी असं बोलत नव्हते. मराठ्यांच्या बाजूने बोलत होते. त्यांच्याबद्दल आम्हाला अपेक्षा नाही. राज ठाकरे यांना मानणारा मराठ्यांमध्ये एक वर्ग आहे. परंतु, त्यांच्यासारखे कायद्याचे अभ्यासक, राजकीय पटलावर भाषणं गाजवणारे नेते असं काहीतरी बोलतील असं मला वाटत नाही. आत्ता तुम्ही पत्रकार सांगत आहात यावर माझा विश्वास बसत नाहीये.

# शेतकरी विदेश अभ्यास दौऱ्यासाठी ५ फेब्रुवारी रोजी लॉटरी प्रक्रिया राबवली जाणार...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील शेतकरी यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे सन २०२४ अंतर्गत कृषी विभागा विभागाकडून प्रस्ताव मागवण्यात आले होते. सदर पात्र प्रस्तावाची सोडत ५ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी ३ वाजता जिल्हा प्रशिक्षण केंद्र बुलडाणा येथे आयोजित केली आहे. तरी सर्व पात्र शेतकऱ्यांनी सोडत प्रक्रिये करिता उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बुलडाणा यांनी केले आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विविध प्रगत देशातील विकसित आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती होण्यासाठी तसेच शेती मालाची निर्यात कृषी मालाचे पणन व बाजारपेठेतील मागणी कृषी प्रक्रिया याबरोबर त्या देशांमध्ये उपयोगात येत असलेल्या अद्यावत तंत्रज्ञान अवगत करून त्यांचा वापर शेतकऱ्याने त्यांच्या शेतात करण्यासाठी सहाय्य करणे विविध देशांनी विकसित केलेली शेती तंत्रज्ञान व अनुषंगिक बाबी यांची माहिती व्हावी या उद्देशाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेट वर चर्चा करून तसेच तेथील क्षेत्रीय भेटी संबंधित संस्थांना भेटी द्वारे त्यांचे ज्ञान क्षमता उंचावण्याचे काम कृषी विभागाच्या वतीने दरवर्षी केले जाते. त्या अनुशंगाने कृषी विभागाच्या वतीने शेती विकासासाठी शेतकऱ्यांना प्रगत देशात घेऊन जाण्यात येते, यंदा पात्र शेतकऱ्यांच्या वतीने प्रस्ताव मागवण्यात आले होते. या विषय जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या



वतीने पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांची सोडत ही ५ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. शेतकऱ्यांची संख्या अधिक असल्याने सदर दौऱ्याकरिता लॉटरी प्रक्रिया राबवली जाणार आहे. तरी या सोडतीसाठी पात्र शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बुलडाणा यांनी केले आहे.

# बुलढाणा तहसीलदार रूपेश खंडारे यांची बदली

## व्ही.एस.कुमरे यांची बुलढाणा तहसीलदार पदी नियुक्ती

**जनसंचलन/ खामगाव**

लोकसभा निवडणूका आता तोंडावर आलेल्या आहे आणि त्या मध्ये प्रशासकीय अधिकारी यांच्या बदल्या सुरू झाल्या आहे.बुलढाणा तहसीलदार रूपेश खंडारे यांची बदली झाली असून त्यांच्या जागी बुलढाणा तहसीलदार म्हणून व्ही. एस. कुमरे यांची निवड करण्यात आली आहे.व्ही.एस.कुमरे यांची तशी बुलढाणा जिल्ह्याशी नाळ पहिल्यापासून जुळलेली आहे.कोरोना काळात त्यांनी मोताळा येथे तहसीलदार होते.आता सध्या ते यवतमाळ जिल्ह्यात दारवा येथे तहसीलदार म्हणून कार्यरत आहे.आता बुलढाणा तहसीलदार म्हणून त्यांना बुलढण्याचा पदभार लवकरचं घेणार आहे.तहसीलदार रूपेश खंडारे यांच्या विरोधात बऱ्यापैकी तक्रारी आल्या



आहे.तसेच दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज यांचा पाठपुरावा सातत्याने सुरू आहे.अनेक नियमबाह्य कामे केल्याच्या तक्रारी सुध्दा त्यांच्या आलेल्या आहे बुलढाणा मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांच्या प्रकरणात त्यांची नाडी जुळलेली आहे.त्यामुळे तहसीलदार खंडारे यांच्या विरोधात आलेल्या तक्रारीच्या माहितीनुसार आम्ही पुरावे जमा करून त्यांनी केलेल्या नियमबाह्य कामाचा पडदाफाश लवकरच करणार आहे.

# विना नंबर वाहनाने अवैध रेती वाहतुकीला आळा घालून महसुल पथक कार्यान्वीत करा...

## अन्यथा तीव्र जन आंदोलन करू भाजपाचा तहसीलदार यांना इशारा...

**जनसंचलन/ लोणार**

लोणार शहरातून व परिसरातून दिवस-रात्र विना नंबर वाहनातून अवैध रेती वाहतूक सुरू असून सदर वाहने हे शहरातून भरधाव वेगाने जात आहे या वाहनाने अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच शासनाची चोरी करत सदर अवैध रेती वाहतूक बंद करत त्याला आळा घालण्यात यावा व महसूल पथक स्थापन करत विना नंबर अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनावर कडक कारवाई करण्याचा ची मागणी भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष गजानन अंकुशराव मापारी यांनी जिल्हाधिकारी बुलढाणा यांना लोणार तहसीलदार गिरीष जोशी मार्फत एका निवेदनाद्वारे दिला आहे , मराठवाड्यातुन सुमारे ५० विनानंबर वाहणे चालु आहे. लोणार शहरातुन व तालुक्यात दिवस रात्र विना नंबर गाड्या ६ ब्रास, २ ब्रास हायवा, टिप्पर, गाड्या अवैद्यरीत्या शहरातुन भरधाव वेगान जात असुन या मुळे शहरात अपघात होण्याची दाट शक्यता आहे. अवैद्य वाहतूक सुरु आहे व या वाहतुक वेळी वाहतुकीचे सगळे नियम धाब्यावर बसून वाहतुक करत आहेत. तरी महसुल विभागाच्या अर्थपुर्ण दुर्लक्षामुळे लोणार तहसिल समोरुन व शहरातील मध्यवर्ती भागातुन विना नंबर वाहनातून अवैद्य रेती वाहतुक सुरु असून एखांदा अपघात घडल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. याला महसुल विभागाने पायबंद घालावी व महसुल पथक कार्यान्वीत करावे तसेच काही भागात महसुल प्रशासनाने जप्त केलेला रेती साठा काही दिवसासाठी पावत्या देत वाहतुकीला मुभा दिली आहे. त्या पावत्या सुद्धा तपासणी व्हाव्यात अन्यथा भारतीय जनता पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागाची राहील. असाही इशारा निवेदनाअंती दिला आहे सदर निवेदन देतेवेळी भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष गजानन अंकुशराव मापारी ,उद्धव आटोळे जिल्हाध्यक्ष सोशल मीडिया,




विष्णू डोळे जिल्हा सचिव,सुरेश अंभोरे भाजपा उपाध्यक्ष,गजानन वरकड कि.मो.तालुकाध्यक्ष,सचिन डहाळके भाजपा उपाध्यक्ष. संजू डोळे सहप्रमुख,शेख जावेद अ.तालुकाध्यक्ष, दत्तात्रय नाडे अ.जा. मोर्चा तालुकाध्यक्ष,उपाध्यक्ष युवा मोर्चा.गजानन गायकवाड. प्रभाकर मोरे. सह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते

# श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न !




**जनसंचलन/ नांदुरा**

श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित येथील श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर मंगळवारी मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप हांडे यांच्या अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा पार पडली, या कार्यशाळेस मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. रवीकुमार शिंदे लाभले तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. अलका मानकर ह्या लाभल्या. कार्यक्रमात डॉ. शिंदे यांनी आपल्या मार्गदर्शनातून शैक्षणिक धोरणाची ठळक वैशिष्ट्ये उपस्थित विद्यार्थ्यांसमोर मांडली. बदलत्या काळाची आव्हाने लक्षात घेऊन स्वतः सह समाजाचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी कौशल्य आधारित कौशल्ये आपल्यामध्ये विकसित केली पाहिजे त्यासाठी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध करून देईल असा विश्वास त्यानी व्यक्त केला. विषय निवडण्याचे स्वातंत्र्य ते अतिरिक्त विषयांचा अभ्यास या पर्यंतचे अनेक पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील ज्यामुळे आपल्या आवडीनिवडी नुसार विद्यार्थ्यांना आता आपले शिक्षण पूर्ण करता येणार असल्याचं ते म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप हांडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे फायदे कथन करत, नवनवीन कौशल्ये आत्मसात केल्याने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होऊ शकतो याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांनी आपले विषय नवडून राष्ट्रीय कार्यास हातभार लावण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. राहुल माहुरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मेहनत घेतली.

# मामा भाची नात्याला काळीमा फासणारी घटना



**वृत्तसंस्था/अमरावती**

मामाने आपल्या १४ वर्षीय भाचीचेच लैंगिक शोषण केल्याची घटना घडली आहे. ही धक्कादायक घटना मध्यप्रदेशातील मुलताई तालुक्यातील एका गावात घडली. पीडित मुलीला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केल्यावर वैद्यकीय तपासणीअंती मंगळवारी ही घटना उघडकीस आली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी आरोपी मामाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलीच्या शाळेला २२ जानेवारी रोजी सुटी होती. त्यामुळे ती घरीच होती. त्यादिवशी तिच्या गावात भंडारा होता. त्यामुळे ती जेवण करण्यासाठी गेली होती. परत येत असताना रस्त्यात तिला तिची मामी भेटली. त्यामुळे ती मामीसोबत त्यांच्याकडे गेली. तेथे सायंकाळी मामीने तिला आणि तिच्या मामाला चहा दिला. त्यानंतर मामी चहा पिऊन गावात भंडारा बनविण्यासाठी निघून गेली. पीडित मुलगी आणि तिचा मामा हे दोघे चहा पित होते. तेवढ्यात मामाने घराचे दार आणि लाइट बंद केले.नंतर त्याने तिचे लैंगिक शोषण केले. या घटनेनंतर पीडित मुलगी ही कशीबशी घरी पोहचली. तिने आपबिती आईकडे कथन केली. दरम्यान, पीडित मुलीची प्रकृती बिघडल्याने तिला वरूड येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले. तेथून तिला जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. वैद्यकीय तपासणीत तिच्यावर अत्याचार झाल्याचे समोर आल्यावर कोतवाली पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी रुग्णालय गाठून पीडित मुलीचे जबाब नोंदविला. त्या आधारावर कोतवाली पोलिसांनी आरोपी मामाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# जिल्हा विज्ञान शिक्षक संघटनेची नूतन कार्यकारणी गठीत वाटप...



**जनसंचलन/बुलढाणा**

५१ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनी राजीव मिलीटरी स्कूल बुलढाणा येथे संपन्न झाली यामध्ये विज्ञान शिक्षक संघटनेची आमसभा घेण्यात आली. यामध्ये जिल्हा विज्ञान शिक्षक संघटनेची नवीन कार्यकारणी ची घोषणा करण्यात आली. कार्यकारणीत जिल्हाध्यक्ष संजय झारे,उपाध्यक्ष दीपक नागरे, संजय मापारी,सचिव प्रशांत खासणे, सहसचिव राजू घोंगडे ,कोषाध्यक्ष किशोर पवार,महिला प्रतिनिधी पुनम चौबिसा,अर्चना गायकवाड, प्राथमिक शिक्षक प्रतिनिधी सुनील फंदाट, प्रसाद काळे, सदस्य पंकज सोनार शेगाव ,विश्वनाथ मांजा नांदुरा,प्रवीण पाटील मलकापूर,प्रदीप नाफडे मोताळा,मुकीम पटेल चिखली, भगवान थोरात देऊळगाव राजा, पाटील सर जानेफळ. निमंत्रित सदस्य सर्व तालुकाध्यक्ष,मार्गदर्शक सुरेश खर्चे,विलास देशमुख,कैलास कडाळे,सुधाकर निर्मळ आदींची निवड झाली अशी माहिती खामगांव तालुका विज्ञान शिक्षक संघटनेचे अध्यक्ष गणेश घोराळे यांनी दिली.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील उपोषणांना जयश्रीताई शेळके यांचा पाठिंबा...

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सचिव जयश्रीताई शेळके यांनी २ फेब्रुवारी २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरु असलेल्या उपोषण मंडपांना भेट देऊन पाठिंबा दिला. तसेच मागण्यांबाबत उपोषणकर्त्यांशी चर्चा केली. यावेळी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सुनील सपकाळ यांची उपस्थिती होती. धनगर समाज अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षण अंमलबजावणी तत्काळ करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते नंदू लवंगे यांनी गेल्या पाच दिवसांपासून उपोषण सुरु केले आहे. राज्यात धनगर समाजाच्या आरक्षण अंमलबजावणी बाबतीत दिवसेंदिवस भावना तीव्र होत आहेत. धनगर समाजबांधव मोठ्या प्रमाणात







मेंढपाळ, अल्पभूधारक व भूमिहीन आहेत. समाजाची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक परिस्थिती बिकट असल्याने या समाजाला अनुसुचित जमातीचे आरक्षण अंमलबजावणी तत्काळ करावी, अशी मागणी उपोषणकर्ते नंदू लवंगे यांनी केली आहे. जयश्रीताई शेळके यांनी त्यांच्या उपोषणाला पाठिंबा दिला. मागणी रास्त असून हा विषय विधानसभेचे विरोधी पक्षनेता विजय वडेट्टीवार, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेता अंबादास दानवे यांच्याकडे लावून धरु, अशी ग्वाही दिली. चिखली, रायपूर पोलीस स्टेशन हद्दीत सुरु असलेले अवैध धंदे बंद करुन पाठीशी घालणाऱ्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी या मागणीसाठी पत्रकार पुरुषोत्तम बोर्डे, इसरार देशमुख यांनी २६ जानेवारीपासून उपोषण सुरू केले आहे. जयश्रीताई शेळके यांनी उपोषकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांबाबत चर्चा केली.

# जिजाऊ, इंटरनॅशनल स्कुल शालेय क्रिडा महोत्सव...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

दिनांक १ फेब्रुवारी रोजी जिजाऊ इंटरनॅशनल स्कुल मध्ये वार्षिक क्रिडा महोत्सव मोठ्या उत्सहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात ही माँ जिजाऊ व सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री. उध्दव नागरे (क्रिडा शिक्षक सिंदखेड राजा), क्रिडाशिक्षक श्री. गजेंद्र देशमुख सर, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेच्या संचालिका डॉ.शिल्पाताई सुनिलजी कायंदे मॅडम यांनी भुषविले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांचे स्वागत हे शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले . क्रिडा महोत्सवाचा कार्यक्रम शाळेच्या क्रिडांगणामध्ये आयोजित करण्यात आला होता. यामध्ये रिले, कदमताल, बांबू ड्रिल, बलून ड्रिल, कबड्डी, खो-खो याप्रमाणे अनेक खेळ घेण्यात आले. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी आपले खेळ कौशल्य दाखवीत मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. त्या वेळी संस्थाचे अध्यक्ष मा.तोतारामजी कायंदे साहेब ,शेख साबेर सेठ .कार्यक्रमाच्यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून लाभलेले श्री. उध्दव नागरे सर व यांनी खेळाचे महत्व काय आहे हे पटवून दिले व सर्व विद्यार्थ्यांचे खेळ बघून त्यांचे कौतुक केले. तसेच श्री. , श्री. गजेंद्र देशमुख सर, यांनी सर्व चिमुकल्यांच्या खेळातील कौशल्याची दाद त्यांना दिली व मोलाचे मार्गदर्शन केले. यानंतर शाळेच्या संचालिका डॉ.शिल्पाताई कायंदे मॅडम यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून शैक्षणिक विकासाबरोबरच शारिरिक व मानसिक विकास होणे आवश्यक आहे हा संदेश दिला. आपण आपल्या पाल्यांच्या आवडीनुसार कलागुणांना वाव मिळावा यासाठी पालकांनी प्रयत्न करावे असे सांगितले. संपूर्ण खेळ खेळून झाल्यानंतर बक्षीस वितरणाचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. यामध्ये सर्व विजयी विद्यार्थ्यांना प्रशस्ती प्रमाणपत्र व सुवर्ण, कास्य व रौप्य असे तीन प्रकारचे पदक प्रमुख



पाहुणे यांच्याद्वारे वितरित करण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून जिजाऊ इंटरनॅशनल स्कूल च्या प्राचार्य सौ.जाधव मॅडम यांनी क्रिडा क्षेत्राचा आढावा सादर केला. त्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. त्याचबरोबर मैदानावर विविध खेळ खेळा. निरोगी राहा असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. देशमुख मॅडम व शिक्षक श्री. खाड़े सर यांनी केले तर वर्ग सहावीच्या विद्यार्थिनी कु. अकात हीने आभार मानले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सौ. जाधव मॅडम .पि.एस.खार्डे,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# ॲड. बाळासाहेब आंबेडकराची पदाधिकाऱ्यांनी घेतली भेट...

## मलकापूर येथे लवकरच होणार सभा

**जनसंचलन/मलकापूर**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांची यशवंत भवन अकोला येथे बुलढाणा जिल्हा महासचिव अतिशभाई खराटे यांचे नेतृत्वात पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली याप्रसंगी ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मलकापूर जि. बुलढाणा येथे जाहिर सभा होणे बाबत चर्चा करण्यात आली या दरम्यान ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी मलकापूर येथे सभेबाबत सकारात्मक चर्चा करून लवकरच तारीख देण्याचे सांगितले यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला असून सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते कामाला लागले आहेत या अनुषंगाने लवकरच मलकापुर



येथे बाळासाहेब आंबेडकर यांची वैचारिक तोफ धडाडणार असून ही परिवर्तनाची नांदी ठरणार आहे या भेटीप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे बुलढाणा जिल्हा महासचिव अतिशभाई खराटे, भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष एस.एस.वले सर यांच्यासह वंचितचे मलकापूर तालुकाध्यक्ष सुशीलभाऊ मोरे, बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष राजुभाऊ शेगोकार, ता.नेते अजयभाऊ सावळे, ता.सचिव गणेश सावळे उपस्थित होते

# महावितरण कंपनीचे थकबाकी वसुली करीता जबाबदारी निश्चित करणारे काढले परिपत्रक...

**वृत्तसंस्था/मुंबई**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी ही देशात नव्हे तर आशिया खंडामध्ये सार्वजनिक वीज उद्योगात वितरणाच्या क्षेत्रामध्ये अग्रगण्य कंपनी आहे. विद्युत मंडळाची निर्मिती ही सामाजिक दृष्टिकोन ठेवून करण्यात आली होती.सन २००३ च्या नवीन विद्युत कायद्याने देशातील केरळ व पंजाब विद्युत मंडळे सोडली तर सर्व राज्यातील विद्युत मंडळाचे विभाजन होऊन ४४ वीज कंपन्या सरकारच्या अधिपत्याखाली वीज क्षेत्रामध्ये काम करत असून खाजगी भांडवलदाराबरोबर त्यांची स्पर्धा सुरू आहे. पूर्वीचे विद्युत मंडळ व आताची वितरण कंपनी यांचे तांत्रिक व अतांत्रिक स्वरूपाच्या कामाची जबाबदारी पूर्वीपासूनच निश्चित केलेली आहे.वेळोवेळी त्यामध्ये गरजेनुसार बदल करण्यात येत असतो.काही वर्षापासून महावितरण कंपनीची आर्थिक परिस्थिती ढासळली व प्रचंड प्रमाणावर थकबाकी वाढत गेली.त्यामुळे दरवर्षी मार्च महिन्यामध्ये सर्व कर्मचारी,अभियंते व अधिकारी यांना वसुलीची जबाबदारी सोपवण्यात येते.सन २०१९- २० मध्ये महावितरण कंपनीची सर्व कॅटेगिरीच्या ग्राहकाकडे असलेली थकबाकी रु.७२००० कोटी होती. सध्या त्यात वाढ होऊन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये रु.८४ ००० कोटीच्या वर पोहोचलेली आहे. थकबाकी वाढण्यास विविध कारणे आहेत.एखाद्या कंपनीची आर्थिक परिस्थिती खराब झाली तर त्याचा परिणाम सर्वत्र होतो.वसुली बाबत दिलेली जबाबदारी कोणत्याही कॅडर मधील कर्मचारी व अभियंते यांनी यापूर्वी नाकारलेले नाही. मुख्यअभियंता यांनी वरिष्ठ व्यवस्थापनाच्या निर्देशानुसार दि.३०.०१.२०२४ रोजी सुधारित परिपत्रक क्र.३२१७ काढून वसुलीची सामुहिक जबाबदारी असल्याबाबतचे स्पष्ट केलेले आहे. (लेखा व मासं) विभागातील कर्मचारी व अधिकारी यांना त्यांचे काम सांभाळून नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार वेळोवेळी थकबाकी वसुलीचे काम सुद्धा करावे लागते. काही कर्मचारी व अधिकारी यांनी संघटना नेतृत्वाकडे वसुली झाली नाही तर आमच्यावर कारवाई होऊ शकते अशी शंका उपस्थित केलेली आहे.याबाबत महावितरण कंपनीच्या वरिष्ठ व्यवस्थापनास दूरध्वनीवर चर्चा करून त्यांनी उपस्थित केलेल्या शंकेबाबत विचारणा केली असता व्यवस्थापनाने स्पष्ट केले की, कोणाला जबाबदार धरून कारवाई करण्याचा व्यवस्थापनाचा अजिबात विचार नाही.कंपनीची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता थकबाकी वसूल करण्याकरीता सर्वांनी सहकार्य करावे असे आव्हान केले आहे.

# हे राजकारण भाजपला परवडणारं नाही मनसे प्रमुख राज ठाकरेंचा सूचक इशारा

वृत्तसंस्था/ नाशिक

देशभरात ईडीसह विविध केंद्रीय तपास यंत्रणांकडून विरोधकांवर ज्या कारवाया सुरू आहेत त्या पाहता हे राजकारण भविष्यात भाजपला परवडणार नाही,फ असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी दिला. सत्तेचा अमरपट्टा घेऊन कुणीच आलेले नसते. उद्या जेव्हा सत्ताबदल होईल, तेव्हा पलीकडच्या बाजूनेही दामदुपटीने कारवाई होईल, तेव्हा काय कराल, असा सवालही ठाकरे यांनी उपस्थित केला. मविआत कोण जाईल, यांचा काही भरवसा आहे का? इंडिया आघाडीत नितीशकुमारही होते, ते कुठे गेले? असा प्रश्न उपस्थित करीत ठाकरेंनी मविआत जाण्यास नकार दिला. नाशिक दौऱ्यात शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्यावर ईडीकडून कारवाई केली जात आहे. महाराष्ट्र, दिल्ली, बिहार आणि इतर राज्यांत विरोधी पक्षांतील नेत्यांमागे केंद्रीय तपास यंत्रणा लागलेल्या आहेत. हे राजकारण पुढे जाऊन सध्याचे सत्ताधारी असलेल्या भाजपला परवडणार नाही, अशी टीका करीत पूर्वीच्या काळात झालं म्हणून आपणही तेच करायचं, हे योग्य नाही, असा सल्लाही दिला. मराठी शाळा सेमी इंग्रजी केल्याशिवाय त्या चालणार नाहीत. प्रत्येक पालकांना आपल्या पाल्याला इंग्रजी यावे, असे वाटते. हा वैयक्तिक प्रश्न असल्याने त्याकडे सामाजिक दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. सेमी इंग्रजी शाळांतील पटसंख्या शंभर टक्के असल्याचा दावाही ठाकरेंनी केला. माझा टोलला विरोध नाही. पण, टोलवर जी रोकड जमा होते, त्याला विरोध आहे. टोलमधून किती गाड्या गेल्या, किती टोल वसूल झाला, त्यातून सरकारला किती पैसा गेला आणि कंत्राटदाराच्या खिशात किती पैसा गेला? याच्यात कोणतीही पारदर्शकता नाही. टोलवरील पैसा हा कंत्राटदाराच्या खिशात जातो. तिथून तो राजकीय पक्षांच्या फंडात जातो, अशा गंभीर आरोप राज ठाकरे यांनी केला.



मलाही कंत्राटदारांकडून पैशांच्या ऑफर आल्या होत्या. मी इथेच मारीन, टोलवरही जाऊ देणार नाही, असा दम देत कंत्राटदारांची ऑफर आपण स्वीकारली नाही, असा खुलासाही ठाकरेंनी केला.

# हा अर्थसंकल्प विकसित भारताचा संकल्प सांगणार-देवेंद्र फडणवीस

जनसंचलन/ नागपूर

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज मांडलेला अंतरिम अर्थसंकल्प हा विकसित भारताचा संकल्प सांगणारा अर्थसंकल्प आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन केले. तसेच आभार मानले आहेत.केंद्रीय अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की, या अंतरिम अर्थसंकल्पात विशेषत: महिला, शेतकरी, गरीब, युवा आणि मध्यमवर्गीय अशा सर्वच घटकांकडे विशेष लक्ष देण्याचा प्रयत्न झाला आहे. १ कोटी कुटुंबांना सोलर यंत्रणा देऊन ३०० युनिटपर्यंत वीज मोफत देण्याचा संकल्प यात आहे. गरीब, चाळीत तसेच झोपडपट्टीत राहणारे मध्यमवर्गीयांना स्वत:चे घर घेण्यासाठी योजना तयार करण्यात येणार आहे. १ लाख कोटींचा व्याजमुक्त निधी तयार करुन युवांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय तर अतिशय क्रांतीकारी आहे. यातून आमचे युवा हे मोठ्या प्रमाणात उद्यमी होतील. यातून संशोधनाला आणि स्टार्टअप इकोसिस्टीमला मोठी चालना मिळेल. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लखपती दिदीफ या कार्यक्रमातून ३ कोटी भगिनींना लखपती बनविण्याचा



संकल्प सुद्धा करण्यात आला आहे. ९ कोटी महिलांना महिला बचत गटांच्या माध्यमातून अर्थकारणाच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न आहे. ११ लाख कोटींची गुंतवणूक रस्ते, रेल्वे, पायाभूत सुविधांसाठी करण्यात येते आहे. यातून विकासाला मोठी चालना मिळेल. या गुंतवणुकीतून एकीकडे पायाभूत सुविधा निर्माण होत असताना रोजगारात सुद्धा वृद्धी होणार आहे. शेतकर्यांसाठी नॅनो डीएपी ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे. शेतकर्यांच्या शेतमालाला भाव आणि थेट बाजारपेठेशी जोडणी यासाठीच्या विविध योजनांचा उहापोह या अंतरिम अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे. विकासाची दिशा सांगणारा पण त्याचवेळी आर्थिक शिस्त पाळणारा, असा हा अंतरिम अर्थसंकल्प आहे. विकसित भारताचा रोडमॅप पूर्णकालीन अर्थसंकल्पातून येईल. हा आत्मविश्वास देणारा सुद्धा हा अर्थसंकल्प आहे, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

# दोन दुचाकींची धडक; एक ठार, दोन गंभीर

जनसंचलन/ डोणगाव

दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाल्याने एक युवक जागीच ठार तर दोन जण गंभीर जखमी झाले. ही घटना २ फेब्रुवारी रोजी अंजनी बु, ते लोणीगवळी रस्त्यावर कांचन गंगा नदीच्या पुलाजवळ घडली. पिराजी घरगडी पवार (वय ६०) असे मृतकाचे नाव आहे. डोणगाव पोलिस स्टेशनअंतर्गत येणाऱ्या अंजनी बु. ते लोणी गवळी रस्त्यावर २ फेब्रुवारीच्या दुपारी तीन वाजतादरम्यान अंजनी बु,कडून लोणी गवळीकडे पिराजी घरगडी पवार हे जात होते. लोणी गवळीकडून अंजनी बुकडे जाणारी मोटारसायकलने त्यांच्या दुचाकीस धडक दिली. यामध्ये पिराजी पवार हे जागीच ठार झाले. दुसऱ्या




दुचाकीवरील दोन जण गंभीर जखमी आहे. दोन्ही गंभीर जखमींना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे दाखल करण्यात आले आहे. तसेच मृतकाचे प्रेत उत्तरीय तपासणीसाठी मेहकर ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल (पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)